# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ४४-२३ दिनांक ०६/०२/२०२३

## नशेसाठी मोटार सायकल चोरी करणा-या आरोपीतास अटक करुन ९ मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांची उकल.
## गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा यांची कामगिरी

दिनांक १८/०१/२०२३ रोजी १०.०० वा ते दिनांक २१/०१/२०२३ रोजी १२.३० वा पर्यंत पुनम क्लस्टर ०२, काशिमिरा, मिरारोड पुर्व, ता जि ठाणे यातील फिर्यादी श्री. राजेश कन्हैयालाल जैन, वय ३२ वर्षे, रा. एल/०८, ११०१, संकल्प म्हाडा कॉम्प्लेक्स, शांतीगार्डन, मिरारोड पुर्व याचे मालकीची ३०,०००/- रु किं. टि.व्ही.एस. कंपनीची अपाची आर.टी.आर १६०/४ व्ही काळ्या रंगाची दुचाकी क्र एम.एच.०४/जेडब्ल्यू/२११४. ही कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या ईरादयाने चोरी करून नेली बाबत काशिमीरा पो.ठाणे येथे गु.र.नं. ६०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत दिवसेंदिवस मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व उघडकीस न आलेल्या गुन्हयांची उकल करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा मार्फत वर नमुद गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना मिळालेल्या तांत्रीक माहितीचे विश्वलेषण करुन तसेच पो.हवा. समिर यादव यांचे गुप्त बातमीदार कडून मिळालेल्या माहितीचे आधारे अज्ञात चोरटयाचा व चोरीस गेले वाहनाचा तपास करीत असता वाहन चोरी करणारा विघ्नेश उदय मिश्रा, वय-२३ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. २०२/ए विंग, जुपीटर बिल्डींग, दिपक हॉस्पीटल जवळ, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व, ता.जि.. ठाणे हा मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक विचारपूस करता त्याने सदर गुन्हयाची कबूली दिल्याने त्यास नमूद गुन्हयात दिनांक ०४/०२/२०२३ रोजी अटक करण्यात आली. नमूद आरोपीताकडून नमुद गुन्हयांतील मोटार सायकल व इतर गुन्हयांतील चोरी केलेल्या एकुण १० मोटार सायकली असा एकुण ४,२०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन ९ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे. सदर वाहनांचे बाबत खालील प्रमाणे दाखल गुन्हे उघडकिस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाण्याचे नांव | गुन्हा रजी.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | काशिमीरा पोलीस स्टेशन | I ६०/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| २. | काशिमीरा पोलीस स्टेशन | I ८७/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ३. | काशिमीरा पोलीस स्टेशन | I ९४/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | काशिमीरा पोलीस स्टेशन | I ९६/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ५. | नवघर पोलीस स्टेशन | I ५०/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ६. | मिरारोड पोलीस स्टेशन | I ४१/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ७. | मिरारोड पोलीस स्टेशन | I ४५८/२०२२ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ८. | तुळींज पोलीस स्टेशन | I ४४७/२०२२ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |
| ९. | डि.एन.नगर पोलीस स्टेशन मुंबई | I १०६/२०२३ | भादंविसं. कलम-३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.निरी पुष्पराज सुर्वे, स.फौ. संतोष चव्हाण, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पोहवा/अविनाश गर्जे, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव यांनी केली आहे.



----oooo----